# वागळे वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

महाराष्ट्र पोलीस सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/२५८/२०२४ दि. २८/११/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये **वागळे** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **लोकमत मिडीया प्रा. लि.** यांचे वतीने आरोग्याविषयी नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी या हेतूने दि.०१/१२/२०२४ रोजी सकाळी ०५:०० ते १०:३० वाजेपावेतो **'लोकमत महामॅरेथॉन'** चे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेमध्ये बहुसंख्य स्पर्धक भाग घेणार असून स्पर्धा पाहण्यासाठी मोठया प्रमाणात प्रेक्षकांची गर्दी होते. त्यामुळे स्पर्धेच्या कालावधीत सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) येऊर गेट – देवदया नगर परीसर – बिरसामुंडा चौकातुन – शास्त्रीनगर – वर्तकनगर कडुन रेमंड कंपनी मार्गे – कडबरी जंक्शनकडे येणाऱ्या वाहिनीवरील सर्व प्रकारच्या वाहनांना वाहतुकीस **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने कॅडबरी जंक्शनकडुन – वर्तकनगर मार्गे – येऊर गेटकडे जाणाऱ्या वाहिनीवरील तीन लेन पैकी एका लेनवरून येऊरगेट, उपवन तलावाकडुन कॅडबरी जंक्शनकडे येवुन इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) देवदयानगर – शिवाईनगर – बिरसामुंडा चौक कडुन देवदयानगर चौकातुन शास्त्रीनगरकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **देवदयानगर चौक येथे 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** देवदयानगर – शिवाईनगर परीसरातील वाहने ही बिरसामुंडा चौक बेथनी हॉस्पीटल–बेथनी हॉस्पीटल मार्गे पुढे इच्छीत स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** येऊर गेट कडुन येणारी सर्व प्रकारची वाहने ही उपवन तलाव – पायलादेवी मंदिर – बिरसामुंडा चौक – बेथनी हॉस्पीटल मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. ०१/१२/२०२४ रोजी सकाळी ०५:०० ते मॅरेथॉन संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ व ५/वि.शा. ठाणे

CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एम. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– संबंधित सपोआ, वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CS CamScanner


Millitary
Ground
UPVAN
उपवन
Overhead
Tank
SHIVAI NAGAR
शिवाई नगर
PAWAR
पवार
Sid
Agilus Diagnostics
- Kalwa, Thane
Precision
Diagnostics Near You
agilus
PL Deshpande Rd
Pokharan Rd Number 2
BHIMNAGAR
भिमनगर
VARTAK NAGAR
वर्तक नगर
प्रवेश बंद
पर्याय मार्ग
ibis Thane
J K GRAM
J K ग्राम
SAMATA NAGAR
समता नगर
LODHA iThink
Viviana Mall
Google

CamScanner